७) सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था
८) सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था
९) सर्व कार्यकारी संचालक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका
१०) सी.जी.एम नाबार्ड व सर्व डी.डी.एम. नाबार्ड
११) सर्व लीड बँक व्यवस्थापक, सर्व जिल्हे
१२) मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषदा.
१३) मुख्य अधिकारी, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, ॲग्रीकल्चरल क्रेडिट डिपार्टमेंट, सेंट्रल ऑफीस, गारमेन्ट हॉऊस, मुंबई-१८.
१४) उपमुख्य अधिकारी, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, ॲग्रीकल्चरल क्रेडिट डिपार्टमेंट, बॉम्बे रिजनल ऑफीस, गारमेन्ट हॉऊस, मुंबई-१८.
१५) सहव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई.
१६) व्यवस्थापक, सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका.
१७) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.
१८) नियोजन विभाग, मंत्रालय.
१९) वित्त विभाग, व्यय-२/ बीयुडी-१२, मंत्रालय.
२०) गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२१) निवड नस्ती, कार्यासन ७-स, सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

पूर्वी रु.१०,००० किंवा त्यापेक्षा जास्त लाभ मिळालेले वरील संवर्गातील ठेवीदार ह्या लाभासाठी अपात्र राहतील.

३) ठेवी परत करण्याच्या शासनाकडील निधी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेमार्फत व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेद्वारे ठेवीदारांना परत मिळतील.

४) निधी पतसंस्थांना शासनातर्फे एक वर्षासाठी बिनव्याजी कर्ज स्वरुपात देण्यात येईल.

५) निधीची परतफेड या संबंधित कर्जदारांकडून सक्तीने वसूल करुन घेणे संस्था चालकांवर बंधनकारक राहील.

सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी सक्षम अधिकारी म्हणून सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे हे जबाबदार राहतील. तसेच सदर उर्वरित संबंधित ठेवीदारांनी परत करण्याबाबतची कार्यपध्दती सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था यांनी निश्चित करुन त्याची काटेकोर अंमलबजावणी करुन त्याबाबतच्या कार्यवाहीचा अहवाल शासनास वेळोवेळी सादर करण्याची जबाबदारी सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची राहील.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ दि.२९/७/२००९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक २००९०८०४१२०७५७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशाने व नावाने

(आ.ना.भोंडवे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन
सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग

प्रत:
१) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
२) मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव ( सर्व )
३) मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक
४) सर्व विभागीय आयुक्त
५) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
६) सर्व जिल्हाधिकारी

मुद्दा ७.४

(९)

राज्यातील अडचणीतील नागरी/ग्रामीण
बिगर शेती पतसंस्थांच्या ठेवीदारांच्या
ठेवींच्या रकमा परत करण्यासाठी
अर्थसहाय्य करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
शासन निर्णय क्रमांक:सीसीआर-११०९/प्र.५८६/७-स
सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक : ४ ऑगस्ट, २००९.

प्रस्तावना :

महाराष्ट्रामध्ये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाखाली नोंदणीकृत एकूण १७२७८ इतक्या नागरी/ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था कार्यरत आहेत. त्यापैकी सन २००७ मध्ये सुमारे ४६२ पतसंस्था आर्थिक गैरव्यवहार व इतर कारणांमुळे अडचणीत आल्या असून अशा अडचणीतील संस्थांना आपल्या ठेवीदारांच्या ठेवींच्या रकमा ठेवीदारांना परत करण्यात अडचणी येत आहेत. रु.१०००० पर्यन्त ठेवी असलेल्या सभासदांना शासनाने त्यांच्या ठेवी संबंधित संस्थांकडून परत मिळण्यास अर्थसहाय्य करावे अशी मागणी शासनाकडे करण्यात येत होती. त्याअनुषंगाने राज्यातील अडचणीतील नागरी/ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थांच्या ठेवीदारांच्या अडचणी लक्षात घेता काही प्रमाणात ठेवीदारांना मदत करण्याच्या हेतूने, अडचणीतील पतसंस्थेमधील दारिद्र्य रेषेखालील, विधवा व सेवानिवृत्तीधारक ठेवीदार यांना ठेवी तात्काळ परत करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यासाठी रु.२०० कोटी पर्यन्तच्या मर्यादेत बिनव्याजी कर्जाच्या स्वरुपात पतसंस्थांना अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता.

शासन निर्णय :-

यानुसार राज्यातील अडचणीतील नागरी/ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थांच्या ठेवीदारांच्या ठेवींच्या रकमा परत करण्यासाठी या संस्थांना सुमारे रु.२०० कोटी इतक्या रकमेचे बिनव्याजी कर्जाच्या स्वरुपात अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाची मान्यता देण्यात येत असून त्याबाबतचे निकष खालीलप्रमाणे राहतील.

१) दारिद्र्य रेषेखालील, विधवा व सेवानिवृत्तीधारक ठेवीदार त्यांच्या प्रत्यक्ष ठेवी, किंवा रु.१०,०००/- पर्यन्त ठेवी परत मिळण्यास पात्र राहतील.